**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित**
**महाबीज भवन: कृषिनगर: अकोला ४४४ १०४**

संदर्भः—महाबीज/प्रशासन/सी—२/२०१७/ 1133 दिनांक : २९/०५/२०१७

## परीपत्रक

**विषय:—नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा—या कर्मचा—यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी अर्जीत रजा रोखीकरण प्रदानापोटी रूपये २ लाख अग्रीम शोधन करणेस्तव मुख्यालयास सादर करावयाच्या प्रस्तावा बाबत.**

महामंडळाच्या मुख्यकार्यालय/विभागीय/जिल्हा कार्यालयाचे अधिनस्थ असलेल्या अधिकारी/कर्मचा—यातून सेवानिवृत्त होणा—या अधिकारी /कर्मचा—यांना व्यवस्थापनाने सप्टेंबर—२०१६ पासून अर्जीत रजा रोखीकरणाचे प्रदानापोटी रूपये २ लाख अग्रीम देण्याकरीता मंजूरात प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार पात्र झालेल्या अधिकारी/कर्मचा—यांना अग्रीम रक्कमेचे शोधन मुख्यालयामार्फत करण्यात आले आहे. तथापी सर्व कर्मचा—याची माहीती वेळेत उपलब्ध व्हावी व सर्वांना याचा फायदा व्हावा या हेतूने आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या कार्यालयातून सेवानिवृत्त होणा—या अधिकारी/कर्मचा—याची माहीती सोबत दिलेल्या प्रपत्रात न चुकता सेवानिवृत्तीच्या महिन्याच्या १५ तारखेच्या आत या विभागास सादर करण्यात यावी. सदर अग्रीम अर्जीत रजेच्या रोखीकरणाच्या देय असलेल्या रक्कमेतून मुख्यालयाचे वित्त विभागातून वसूल करण्यात येईल

तेंव्हा सर्व सबंधीतांना या परीपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की अर्जीत रजेच्या रोखीकरणापोटी अधिकारी/कर्मचारी यांना अग्रीम रक्कम देण्याबाबतचा प्रस्ताव पाठवितांना खालील प्रमाणे दक्षता घेण्यात यावी.

१. सेवानिवृत्त होणा—या अधिकारी /कर्मचा—याचे सेवानिवृत्तीच्या अंतीम महिन्याचे मुळ वेंतन, ग्रेड पे , डी.ऐ यानुसार होणारे एकूण वेतन तसेच सेवानिवृत्तीच्या ताररखेपर्यंत त्यांचे खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेच्या व महामंडळाने गॅरंटी /हमी घेतलेल्या सर्व कर्जाची सद्यस्थितीतील बाकी (उदा. सोसायटी लोन, हाउसिंग लोन , बॅक लोन इ ) माहीती सोबत दिलेल्या प्रारूपात **प्रपत्र—१** मध्ये सादर करण्यात यावी.

२. सेवानिवृत्त होणा—या अधिकारी/कर्मचा—यांकडून सोबत जोडलेल्या प्रारूपात **प्रपत्र—२** नुसार अर्जीत रजेच्या रोखीकरणापोटी रूपये २ लाख अग्रीम अग्रीम मिळण्याबाबतचा अर्ज घेण्यात येउन प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

३. संबंधीत कर्मचा—याकडून कोणतीही घेणे देणे बाकी नाही याबाबत तसेच कोणतीही विभागीय चौकशी नाही अथवा प्रस्तावीत नाही याबाबतचे प्रमाणपत्र **प्रपत्र—३** नुसार प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

४. संबंधीत कर्मचा—यांना आरटीजीएस द्वारे शोधन करण्याकरीता संबंधीत कर्मचा—याचे ज्या बॅकेत खाते आहे त्या बॅकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

उपरोक्त मुद्यांचा विचार करून अर्जीत रजेच्या रोखीकरणापोटी रूपये २ लाख अग्रीम अग्रीम मिळण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी.
**सोबत — वरील प्रमाणे प्रपत्र १ ते ३**

म.रा.बि.म.मर्या.करीता

(मा. व्य.सं.यांचेकडून मान्य)

(अशोक अमानकर)
महाव्यवस्थापक(प्रशासन)

प्रतिलिपी,
१) महाव्यवस्थापक मराबिम मर्या ............. (सर्व)
२) विभागीय व्यवस्थापक मराबिम मर्या. (सर्व) ..........
३) जिल्हा व्यवस्थापक मराबिम मर्या. (सर्व)...........
३) संबधीत नस्ती

प्रपत्र — १

| अ.क्र | तपशील | | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कर्मचा—यांचे नाव | ....... | |
| २ | हुद्दा | ....... | |
| ३ | सद्या नोकरीचे ठिकाण | ....... | |
| ४ | मुळ वेंतन | ........ | |
| ५ | ग्रेड पे | ........ | |
| ६ | डी.ए | ........... | |
| ७ | एकूंण वेतन ( ४ ते ६) | ......... | |
| ८ | रजा रोखीकरणाचे शिल्लक जमा दिवस (अर्जीत रजा) | .......... | |
| ९ | महामंडळाने गॅरंटी घेतलेल्या सर्व कर्जाची सद्यस्थितीतील बाकी (उदा. सोसायटी लोन, हाउसिंग लोन , बॅंक लोन इ ) | | |
| १० | अर्जीत रजा रोखीकरण प्रदानापोटी रूपये २ लाख मंजूरीस्तव अभिप्राय | | |

दिनांक ...................

ठिकाण......................

विभाग प्रमुख / विभागीय व्यवस्थापक /
जिल्हा व्यवस्थापक
म.रा.बि.म. मर्या ............................

प्रपत्र — २

**सेवानिवृत्त होणा—या कर्मचा—यांनी अर्जीत रजेपोटी अग्रीम मिळणेबाबत करावयाचा अर्ज**

दिनांक .............

प्रति,
मा.महाव्यवस्थापक
विभागीय व्यवस्थापक
जिल्हा व्यवस्थापक
———————

**विषय:—नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा—या कर्मचा—यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी अर्जीत रजा रोखीकरण प्रदानापोटी रूपये २ लाख अग्रीम मिळणे बाबत.**

**महोदय**

मी श्री ........................................... पदनाम ....................... या पदावरून दिनांक ........ ..................... रोजी नियत वयोमानानुसार म.रा.बियाणे महामंडळाच्या सेवेतून या ................. कार्यालयातून सेवानिवृत्त होत आहेत सेवानिवृत्तीनंतर मला महामंडळाकडून वेतन प्राप्त होणार नाही तसेच मला देय असलेली प्रदाने यथावकाश प्राप्त होतील त्यामुळे मला अर्जीत रजा रोखीकरणाच्या प्रदानापोटी प्राप्त होणा—या रक्कमेतून रूपये २ लक्ष अग्रीम रक्कम दिनांक .............. रोजी प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर अग्रीम रकम मला देय असलेल्या अंतीम प्रदानातून वजा करण्यात यावी ही विनंती

तसेच सदर रक्कम जमा करण्याकरीता या पत्रासोबत माझे बॅकेत खाते असलेल्या पास बुकच्या पहील्या पानाची छायांकीत प्रत देत असून त्यात आरटीजीएस करण्याकरीता आयएफएससी कोड व खाते क्रमांक आहे. तरी मला अग्रीम रक्कम देण्यात यावी ही विनंती.

तपशील : कर्मचा—याचे पुर्ण नांव ...........................................................
पदनाम....................................

बॅकेचा खाते क्रमांक......................................
आयएफएससी कोड ...............................

आपला विश्वासु

( नाव व सही )

प्रपत्र — ३

मुख्यालयातील विभागप्रमुख /विभागीय व्यवस्थापक/ जिल्हा व्यवस्थापक यांनी सही शिक्यानीशी द्यावयाचे प्रमाणपत्र

## प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की श्री .............................................. पदनाम ................ हे दिनांक .......................... रोजी नियत वयोमानानुसार म.रा.बियाणे महामंडळाच्या सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. आज रोजी त्यांचे कडून महामंडळास कोणतेही आर्थीक येणे बाकी नाही. तसेच त्यांनी सेवानिवृत्तीच्या महिन्यात कोणत्याही स्वरूपाची अग्रीम रक्कमेची उचल केली नाही. तसेच त्यांचेविरूध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रलंबीत नाही.

श्री .................. यांचा अग्रीम रक्कम मिळण्याबबात अर्ज प्राप्त झाला असल्याने त्यांना अर्जीत रजा रोखीकरणाच्या प्रदानापोटी प्रदान करण्यात येणा—या रक्कमेपैकी महामंडळाचे नियमानुसार अग्रीम देण्यास कोणतीही हरकत नाही.

दिनांक ....................

ठिकाण.......................

विभाग प्रमुख / विभागीय व्यवस्थापक /
जिल्हा व्यवस्थापक
म.रा.बि.म. मर्या ............................